# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/05/2023 (बुधवार) दुपार

---

## जबर दुखापत

**१) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा लाडगाव येथे दिनांक २३/०५/२०२३ चे १७/३० वा. ते १८/०० वा. चे दरम्यान फिर्यादी नामे– विकेश शेषराव दहेरकर वय २६ वर्ष रा. लाडगाव ता. काटोल हे आपले घरी हजर असता यातील आरोपी नामे– नरेन्द्र शेषरावजी मिसळकर हा फिर्यादीच्या घरी हातात कुऱ्हाड घेवून आला व तु जास्त माजला का तुला जीवाने खत्म करतो असे म्हणून शिवीगाळ करुन आरोपीने त्याच्या हातातील कुऱ्हाड फिर्यादीच्या डोक्यावर मारुन जखमी केले व फिर्यादीच्या डोक्यातुन रक्त निघाले फिर्यादीची आई मध्ये आली असता तिला सुध्दा ढकल ढुकल करुन शिवीगाळ केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ४५२, ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पी.एस.आय. आगासे पो.स्टे काटोल मो. नं. ८४४६२८३९२५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा अजनी ता. सावनेर येथे दिनांक २३/०५/२०२३ चे ०६/३० वा. ते ०७/०० वा. चे दरम्यान फिर्यादी नामे– श्रीमती प्रमीला मनोहर कातकडे, वय ५५ वर्ष, रा. अजनी शेरडी ता. सावनेर ही आपले घरी अंगणात घरगुती काम करीत असता आरोपी नामे– अमर बंडुजी सराटे रा. अजनी हा फिर्यादीचे घरासमोरील रोडवर जोरजोराने बोलुन शिवीगाळ करीत होता फिर्यादीने आरोपीस हटकले असता आरोपीने फिर्यादी सोबत शाब्दीक वादविवाद करुन जमिनीवरील विट हातात घेवून डोक्यावर मारले त्यामुळे फिर्यादीचे डोके फुटून रक्त निघाले तसेच काठी घेवून उजवे हातावर व डावे हातावर मारले त्यामुळे उजवे हातावर जखम झाली असुन डावे हातावर मुक्का मार लागला आहे तसेच शिवीगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ५०४, ५०६ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा खोडनकर ब. नं. १७९१ पो.स्टे. सावनेर मो. नं. ९१५८९७३७५० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर